सकाळ | पिंपरी-चिंचवड
रविवार । ११ जानेवारी । २००९
TODAY

# निवेदन, सूत्रसंचालन आणि आता गेम शो

## चैतालीची वाटचाल : कलागौरव समारंभात करणार सादरीकरण

**लक्षवेधी**


चैताली

पिंपरी, ता. १० : निवेदन, सूत्रसंचालन आणि विनोदी किश्श्यांचे सादरीकरण या बरोबरच पुण्याच्या चैताली माजगावकरने लग्न- मुंजीच्या समारंभासाठी 'गेम शो'चा नवीन प्रकार सुरू केला आहे. झी मराठीवरील 'हास्यसम्राट' या मालिकेच्या उपांत्य फेरीपर्यंत मजल मारल्यानंतर पुढील प्रवासासाठी ती नवीन कल्पना सादर करीत आहे.

चिंचवडमधील कलारंग संस्थेतर्फे रविवारी (ता. ११) कलागौरव पुरस्कार प्रदान समारंभ होत आहे. त्या वेळी चैताली विनोदी किश्श्यांचे सादरीकरण करणार आहे. 'हास्यसम्राट'मधील सहभागानंतर तिला प्रथमच पिंपरी- चिंचवडमध्ये व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. त्यानिमित्त तिच्याशी संवाद साधला. लहानपणापासूनच स्वतंत्रपणे सादरीकरणाचे बाळकडू मिळाल्यामुळे चैतालीने याच क्षेत्राची करिअरसाठी निवड केली. ती मूळ साताऱ्याची असली, तरी शिक्षण आणि करिअरनिमित्त गेल्या आठ वर्षांपासून पुण्यात स्थायिक आहे. पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातून तिने नाट्यशास्त्राची पदवी घेतली. त्यानंतर 'सारीपाट हा संसाराचा', 'चोरावर मोर' या मालिकांमधून भूमिकाही केल्या.

चैताली म्हणाली, "माझे वडील सुरेंद्र माजगावकर हे नकलाकार आहेत. काका जादूचे प्रयोग करीत होते. लहानपणी वडिलांबरोबर 'गंमत जंमत'चे अनेक द्विपात्री प्रयोग केले आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या सादरीकरणाची आवड आणि सवयही लागली. यातच करिअर करायचे ठरविल्याने विनोदी साहित्याचे वाचन, कार्यक्रम पाहणे ओघाने आलेच. घरातून बाहेर पडल्यापासून लोकांचे निरीक्षण करू लागले. यातून मला अनेक लकबी, बोलण्याच्या विविध पद्धती मिळत गेल्या. माझ्या निरीक्षणातील या व्यक्ती सादरीकरणातील महत्त्वाच्या भाग बनू लागल्या."

चैतालीने नुकताच विविध समारंभांसाठी स्वतःचा गेम शो तयार केला आहे. ती म्हणाली, "लग्न, मुंज, वाढदिवस अशा समारंभासाठी मनोरंजक खेळ तयार केले आहेत. कुटुंबातील सर्व मंडळी यात सहभागी होऊ शकतात. लहान मुले, महिला, तरुणांसाठी; तसेच, आजी- आजोबांसाठी खास खेळ आहेत. या नवीन 'ट्रेंड'लादेखील चांगला प्रतिसाद मिळत आहे."

### प्रेक्षकांची दाद

"माझ्या आतापर्यंतच्या सादरीकरणातील लतादीदींची मिमिक्री आणि डॉनची ऑडिशन या प्रकारांना प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली आहे. अनेक ठिकाणी या सादरीकरणाची मागणीही केली जाते. चिंचवडला होणाऱ्या सादरीकरणात शब्दांच्या अर्थांचे महत्त्व; तसेच हे अर्थ माहीत नसल्यामुळे सूत्रसंचालकाची होणारी गडबड मी सादर करणार आहे," असे चैताली माजगावकरने सांगितले.